**-: प्रेस नोट :-** दिनांक २५/०८/२०२३

# जन्मठेपेची शिक्षा भोगत असताना पॅरोलवरून फरार झालेल्या आरोपीतास मिर्झापुर,उत्तरप्रदेश येथुन अटक.

| | | |
|---|---|---|
| १ | कक्ष | गु.प्र.शा., गु.अ.वि., कुर्ला (प.), मुंबई ७०. |
| २ | गु.नो.क्र. व कलम | ओशीवरा पोलीस ठाणे गु.र.क्र. ११२९/२०२२, कलम २२४ भा.द.वि. |
| ३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ | दि. २६/०५/२०२२ ते ०४/०८/२०२२ दरम्यान |
| ४ | गुन्हा दाखल दिनांक | दि.०४/०८/२०२२ रोजी २३.३१ वाजता. |
| ५ | आरोपीचे नाव | पुरुष, वय ३५ वर्षे, रा.ठि. जोगेश्वरी पश्चिम, मुंबई |
| ६ | गुन्हयाचा हेतू | जन्मठेपेशी शिक्षा भोगत असताना पॅरोलवरून फरार होणे. |
| ७ | थोडक्यात प्रेस नोट | खालील प्रमाणे |

दिनांक २७/०२/२०१७ रोजी मा. अतिरिक्त सत्र न्यायालय, मुंबई यांनी एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे,मुंबई येथील गु.र.क्र. ३८६/२०११ कलम ३०२, ३०७, ३४२, ४५२, ३२३, ३४ भा.द.वि. या गुन्हयातील फरार आरोपीतास जन्मठेप व दंड रू ५७,०००/- अशी शिक्षा सुनावलेली होती. त्यानंतर सदर शिक्षाबंदी आरोपी हा येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे जन्मठेपेची शिक्षा भोगत होता.

दिनांक २०/०६/२०२० रोजी अधिक्षक येरवडा मध्यवती कारागृह यांचे आदेशानूसार सदर शिक्षाबंदी आरोपीस दिनांक २०/०६/२०२० ते दिनांक ०४/०८/२०२० रोजी पर्यत रजेवर सोडण्यात आले होते. सदर रजेचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर सदर शिक्षाबंदी आरोपीस परत कारागृहात दाखल होणे आवश्यक असताना तो कारागृहात हजर न होता बेकायदेशीररित्या फरार झाला होता. म्हणुन येरवडा मध्यवर्ती कारागृह पोलीसांनी दिनांक ०४/०८/२०२२ रोजी त्याच्याविरुदध ओशीवरा पोलीस ठाणे येथे भा.द.वि. कलम २२४ अन्वये गुन्हा नोंद केला होता.

सदर शिक्षाबंदी आरोपीतास जन्मठेपेची शिक्षा लागलेली असताना तो फरार झाला असल्याने सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून कक्ष ५ मार्फतीने सदर आरोपीताचा कसून शोध घेण्यात येत होता. सदर फरार शिक्षाबंदी आरोपीताचा तांत्रिकरित्या शोध घेत असताना सदर आरोपीत जिल्हा मिर्झापूर राज्य उत्तरप्रदेश येथे लपून असल्याचे आढळून आल्याने सदरठिकाणी जावून गोपनिय सुत्रांमार्फत शोध घेवुन सापळा रचून फरार आरोपीतास शिताफिने अटक करण्यात आले आहे.

अशाप्रकारे येरवडा जेल मध्ये जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या व पॅरोलवरून फरार झालेल्या आरोपीताचा कोणत्याही प्रकारे सुगावा लागत नसताना तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे कक्ष ५ यांनी अथक परिश्रम घेवून फरार शिक्षाबंदी आरोपीतास अटक केले आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, मुंबई, श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, मुंबई, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), मुंबई, श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशीकुमार मीना, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण), श्री. राज तिलक रौशन, मा. सहा. पो. आयुक्त (मध्य), श्री. दत्तात्रय नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष ५ चे प्र.पो.नि. घनश्याम नायर, पो.नि. अजित गोंधळी, पो.ह.अविनाश चिलप, पो.शि. सरफरोज मुलाणी व पो.शि. प्रमोद पाटील यांनी केली आहे.